# :: जाहिरात ::

## मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद

क्र. प्रशासन/६००/२०२४, दिनांक: १९/०३/२०२४

मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद आस्थापनेवर **"सफाई कामगार"** पदाकरिता सहा उमेदवारांची निवड यादी तसेच, एका उमेदवाराची प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी निरोगी, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्दीच्या दिनांकापासून दोन वर्षांसाठी वैध राहील. सदर पदाची वेतनश्रेणी सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मॅट्रीक्स एस—३: रूपये १६६००—५२४०० अधिक नियमानुसार देय भत्ते अशी राहील.

प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या पात्रतेची पूर्तता करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहीत नमुन्यात **[जाहिरातीसोबत परिशिष्ट—'अ' प्रमाणे]** आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या स्वत: प्रमाणित केलेल्या (Self Attested) छायांकित प्रतींसह दिनांक **१० एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी या कार्यालयात पोहोचेल अशा रीतीने फक्त स्पीड पोस्टामार्फत पुढील पत्त्यावर पाठवावेत.

**"प्रबंधक (प्रशासन),**
**मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद,**
**जालना रोड,**
**छत्रपती संभाजीनगर — ४३१ ००९"**

स्पीड पोस्टाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातून किंवा वरील नमूद केलेल्या तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

**अ) पात्रता :—**

१) उमेदवार भारताचा नागरीक असावा

२) उमेदवार किमान इयत्ता चौथी उत्तीर्ण असावा.

३) उमेदवार जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेला १८ वर्षापेक्षा लहान व ३८ वर्षापेक्षा

Mahabharti.in

मोठा नसावा. मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षाची असेल. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांना वयाची अट नाही, तथापि, त्यांनी त्यांच्या कार्यालयामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे.

४) उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

५) उमेदवाराला शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पुरेसा अनुभव असणे आवश्यक आहे.

**ब) <u>पात्र उमेदवारीकरिता अटी :—</u>**

१) उमेदवार करार करणेस सक्षम असावा.

२) उमेदवाराला नैतिक पतनाच्या गुन्हयासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा उमेदवाराला कोणत्याही न्यायालय/महाराष्ट्र लोकसेवा आयोग/ संघ लोकसेवा आयोग किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडीमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे प्रतिरोधीत केले नसावे किंवा अपात्र ठरवले नसावे.

३) उमेदवाराला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले नसावे किंवा उमेदवाराच्या विरूध्द फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४) न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ नुसार उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक नसावी.

**क) <u>उमेदवारांनी अर्जासोबत खालील दाखल्यांच्या स्वत:प्रमाणित (self attested) केलेल्या छायांकित प्रति सादर कराव्यात —</u>**

१) शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (उदा. ४थी, ७वी, १०वी, १२वी इत्यादी).

२) जन्मतारखेचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र) अथवा तत्सम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जन्मतारखेचा पुरावा.

Mahabharti.in

३) उमेदवार दिव्यांग असल्यास दिव्यांगत्वाचा दाखला.

४) जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी).

५) सफाई कामाचा पुर्वानुभव असल्यास अनुभव प्रमाणपत्र.

६) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

७) विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत, जर उमेदवाराने नाव बदलले असल्यास नाव बदलाबाबतचे दस्तऐवज उदा. शासकीय राजपत्र किंवा सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

८) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

९) इतर विशेष अर्हता असल्यास त्याबाबतचा दाखला.

१०) न्यायालय प्रशासनाने विचारल्यास इतर कोणतेही दस्तऐवज.

## ड) <u>उमेदवारांनी अर्जासोबत खालील मूळ दाखले/कागदपत्रे जोडावीत—</u>

१) लहान कुटुंबाबाबत प्रतिज्ञापन [जाहिरातीसोबत नमुना ‘अ’ प्रमाणे]

२) जाहिरात प्रसिध्दीनंतरची तारीख असलेले, दोन प्रतिष्ठीत व्यक्तींनी दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे दोन प्रमाणपत्र (त्यांचा हुद्दा, पत्ता व संपर्क क्रमांक) [जाहिरातीसोबत परिशिष्ट—‘ब’ नमुन्यात]

३) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची (कार्यालयाची) मंजुरी घेतल्याचे ना—हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

४) अर्जासोबत स्वत:चा पत्ता ठळक अक्षरात लिहिलेले पाच रुपयाचे पोस्टाचे तिकीट लावलेले कोरे पाकीट पाठवावे.

५) पासपोर्ट आकाराचा स्वत:चा एक फोटो सोबत पाठवावा.

## इ) अर्जांची छाननी/अल्पसूची

१) जाहिरातीतील तरतुदीनुसार केवळ किमान अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षा/शारीरिक कार्यक्षमता चाचणी/मुलाखत यासाठी बोलवण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

२) तसेच सदर पदासाठी किमान अर्हता आवश्यक असून ती धारण करणाऱ्या सर्वच उमेदवारांना प्रात्यक्षिक परीक्षेसाठी बोलविण्यात येईल असे नाही.

३) तसेच केवळ उमेदवाराचे **अल्पसूची** मध्ये नाव आले म्हणून संबंधित

Mahabharti.in

पदासाठी उमेदवारी निश्चित झाली असे नाही.

४) अल्पसूचीत समाविष्ट उमेदवार (Shortlisted Candidates) जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र असल्याचे समजून त्यास प्रात्यक्षिक परीक्षेकरिता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल.

## फ) मूल्यांकन पध्दती

प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर **अल्पसूची** प्रमाणे पात्र उमेदवारांना

१) खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल —

| अ.क्र. | मूल्यांकन पध्दती | गुण |
|---|---|---|
| १ | प्रात्यक्षिक परीक्षा<br>(किमान उत्तीर्ण गुण १५) | ३० |
| २ | शारीरिक कार्यक्षमता चाचणी | १० |
| ३ | तोंडी मुलाखत | १० |
| **४** | **निवड प्रक्रियेचे एकूण गुण** | **५०** |

## ग) अर्ज करण्याची पद्धत

१) उमेदवाराने संपूर्ण जाहिरात तपशीलवार वाचावी व अर्जात भरलेला तपशील योग्य आहे हे सुनिश्चित करुन घेऊन अर्ज सादर करावा. उमेदवाराने एकापेक्षा अनेक अर्ज सादर केल्यास शेवटी सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाईल. त्यासंबंधी उच्च न्यायालय प्रशासनाकडून त्याबाबत कोणतीही तक्रार/दावा ऐकला जाणार नाही तथा विचारात घेतला जाणार नाही.

२) विवाहित महिला उमेदवारांनी किंवा कोणत्याही कारणास्तव नावात बदल केलेल्या उमेदवारांनी अर्जामध्ये शैक्षणिक पात्रता (उदा. ४थी, ७वी, १०वी, आणि १२वी इत्यादी) तत्सम अर्हता धारण करताना त्यांचे जे नाव होते त्याच नावाने अर्ज करणे अनिवार्य आहे.

३) **सफाई कामगार** पदासाठी इयत्ता चौथी मधील गुण नमूद करणे अनिवार्य आहे. जर उमेदवार इयत्ता चौथी परीक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता उदा. १० वी/१२ वी/पदवी प्राप्त असेल व त्याच्याकडे/

Mahabharti.in

तिच्याकडे इयत्ता चौथी चे गुणपत्रक नसेल तर त्याने/तिने अर्ज भरताना इयत्ता चौथी करिता काल्पनिकरित्या ५०% गुणांची (उदा. एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी.

४) राज्य शासनाच्या इतर विभागात असलेल्या कर्मचाऱ्यांनी अर्ज भरण्यापूर्वी सध्याच्या नियोक्त्याकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. उच्च न्यायालय प्रशासनाकडून निर्देशित केल्यावर ते सादर करावे लागेल.

५) उमेदवारांनी त्यांचा वैध ई—मेल आय डी तसेच मोबाईल नंबर अर्जात नमूद करावा ज्यावर आवश्यकता भासल्यास पत्रव्यवहार तसेच संपर्क केला जाईल.

## ह) उमेदवारांकरिता इतर आवश्यक सूचना :

१) अर्ज पाठवताना पाकिटावर **"सफाई कामगार या पदाकरिता अर्ज"** असे ठळक अक्षरात लिहावे.

२) अर्जातील विहित जागी उमेदवाराने स्वत:चे अलीकडील काळातील पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (फोटो) चिकटवावे.

३) उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातच अर्ज सादर करावा. सदर अर्जातील माहिती स्पष्ट हस्ताक्षरात लिहावी. अर्ज अपूर्ण भरलेला असेल किंवा वाचता येण्याजोगा नसेल किंवा विहित नमुन्यात नसेल तर असा अर्ज नाकारण्यात येईल आणि त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) अर्ज भरताना कोणतेही शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तथापि, अल्पसूची प्रसिध्द केल्यानंतर त्यात समाविष्ट असलेल्या उमेदवारांनीच (Shortlisted Candidates) तद्नंतर "**Registrar High Court Bench at Aurangabad**" यांचे नावे राष्ट्रीयकृत बॅकेतून रूपये **२००/—** चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) अथवा पोस्टल ऑर्डर काढावी लागेल. सदरील शुल्क ना—परतावा राहील.

५) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी

Mahabharti.in

माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. अथवा नियुक्ती झाल्यास त्याला/तिला पदावरून काढून टाकण्यात येईल.

६) जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जांच्या संख्येनुसार व उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार तसेच शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा व कार्यालय परिसर स्वच्छतेचा असलेल्या अनुभवानुसार उमेदवारांची अल्पसूची (Shortlist) प्रसिध्द करण्यात येईल. अल्पसूची (Shortlisting) करण्याचे सर्वाधिकार मा. निवड समिती, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

७) पात्र उमेदवारांची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी, तोंडी मुलाखत ही **मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — ४३१ ००९,** या ठिकाणी घेण्यात यईल.

८) पात्र उमेदवारांनी प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी, तोंडी मुलाखतीसाठी नियोजीत तारखांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

९) सदर पदाची प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी उपस्थित राहताना त्यांनी प्रवेशपत्र, तसेच, या कार्यालयास मान्य होईल असे स्वत:चे फोटो असलेला ओळखीचा पुरावा जसे की, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहनचालक परवाना यापैकी कोणताही एक मूळ पुरावा आणावा. प्रवेशपत्राच्या सादरीकरणाशिवाय उमेदवाराला उपरोक्त चाचणींसाठी प्रवेश मिळणार नाही.

१०) उमेदवारांची निवड ही सफाई कामगार पदाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे केली जाईल.

११) प्रात्यक्षिक परीक्षा, आणि शारीरिक कार्यक्षमता चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी आणाव्यात. योग्य छाननीनंतर केवळ पात्र उमेदवारांनाच मुलाखतीसाठी

उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात येईल.

१२) सफाई कामगार पदाच्या प्रात्यक्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास उमेदवार उर्वरित चाचणीसाठी पात्र राहणार नाही.

१३) कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशिरा मिळाल्याने नियोजित तारखेस व वेळेस उमेदवार सफाई कामगार पदाच्या प्रात्यक्षिक परीक्षा, शारीरिक कार्यक्षमता चाचणी व तोंडी मुलाखतीस अनुपस्थित राहिल्यास उच्च न्यायालय प्रशासनाकडून याबाबत कोणतीही तक्रार/दावा ऐकला जाणार नाही तथा विचारात घेतला जाणार नाही.

१४) सदर भरती रद्द झाल्यास याबाबत उमेदवाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, तसेच पदसंख्येतील बदल याबाबत सर्व अधिकार मा. निवड समिती, मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबतीत कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

१५) केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणुकीचा हक्क मागता येणार नाही.

१६) कार्यालयाच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षीत घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते, तसा बदल वेळोवेळी उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. त्याकरिता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळ https://bombayhighcourt.nic.in ला वेळोवेळी भेट द्यावी.

१७) सदरहु पदे जस—जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश जारी करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१८) निवड झालेला उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत सेवेत रूजू होऊ शकला नाही तर त्याचे नाव निवड/प्रतिक्षा यादीतून कमी केले जाईल.

१९) निवड यादीतील उमेदवार विहित कालावधीत रुजू न झाल्यास अथवा रुजू झाल्यानंतर निवड यादीच्या वैध कालावधी संपण्यापुर्वी सेवा सोडून गेल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवाराचा विचार नियुक्तीसाठी केला जाईल तथापि, प्रतिक्षा यादीमध्ये केवळ नाव समाविष्ट केल्यामुळे सदर उमेदवाराला नियुक्तीचा अधिकार प्राप्त होणार नाही.

२०) निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. तथापि, परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याचे घोषित करेपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही पूर्वसूचना/नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केली जाईल.

२१) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्याच्यावर निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीशः अथवा इतर कोणा मार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला/तिला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी मा. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

२२) वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

२३) या निवड प्रक्रीयेत मा. निवड समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल.

**ई) "सफाई कामगार"** पदाची कर्तव्ये

१) माननीय न्यायाधीशांच्या चेंबरची स्वच्छता तसेच तेथील स्वच्छतागृह, शौचालय आणि स्नानगृहे स्वच्छ व निटनिटके ठेवणे.

२) राजशिष्टाचार अधिकारी तथा न्यायालय रक्षक द्वारे नियुक्त केलेली इतर कोणतीही कामे.

*स्वाक्षरी/—*
(विमलनाथ एस. तिवारी)
प्रबंधक (प्रशासन)

दिनांक : १९/०३/२०२४

Mahabharti.in